# प्रकरण - सहावे

## "निष्कर्ष"

# प्रकरण - सहावे

## "निष्कर्ष"

भारतीय कथावाङ्मयाच्या जन्मखुणा खूप मागे म्हणजेच वेदकालात सुध्दा सापडू शकतात· श्री·श्रोत्रिय याच्या "वेदातील गोष्टी" याच भारतीय कथावाङ्मयाचे मूळ ठरतात·

मराठी कथावाङ्मयाची बीजेही खूप मागे म्हणजे प्राचीन काळातही सापडू शकतात· आणि या कथावाङ्मयाचा अलिखित स्वरुपातील जन्मकाल तर याही खूप मागे जाईल· परंतु लिखित स्वरुपातील मराठी कथावाङ्मयाच्या जन्मखुणा शोधताना, तेराव्या शतकातील विष्णुशर्मा याने "पंचतंत्र" हे मराठी कथावाङ्मयाचे पहिले पुस्तक ग्रहीत धरावे लागते·

इ·स·1800 पर्यंत मराठी कथावाङ्मयाचा अवतार हा पद्यात्मक स्वरुपाचा होता· अध्यात्म प्रबोधन व नीतीतत्त्वबोध हेच या कथांचे उद्दिष्ट होते·

इ·स·1800 ते 1885 या काळात मराठी कथावाङ्मयाने गद्यरुप धारण केले· या काळात भाषांतरीत कथांची सरशी झाली· कृष्णशास्त्री चिपळूणकर व स·का·छत्रे यांनी भाषांतरीत कथा लिहल्या· या कथा बाळबोध व अद्‌भूत अशा होत्या·

इ·स·1885 ते 1925 या काळात हरिभाऊनी अद्‌भूत कथेला वास्तवात आणले· तिला लौकिक स्वरुप मिळवून दिले· या काळातील कथांचे उद्दिष्ट केवळ करमणुक व मनोरंजन एवढेच दिसून येते· तरीही दिवाकर कृष्णांनी मात्र, याच काळात कथेकडे एक कलाप्रकार म्हणून पाहिले·

इ·स·1925 ते 45 हा काळा फडके-खांडेकर यांच्या ऐन उमेदीचा काळ· इथूनच जीवनवाद व कलावादाला प्रारंभ झाला· पुढे-पुढे त्याचा अतिरेक होऊन मराठी कथा कृत्रिम जीवनवादात नि फोल तंत्रवादात अडकून पडली· पण, याच काळात मामा वरेरकर, साने गुरूजी, अनंत काणेकर, प्रभाकर पाध्ये, वामन चोरघडे, य·गो·जोशी यांनी वास्तवतेकडे - अस्सलतेकडे झुकणा-या कथांची निर्मिती केली·

इ·स·1945 ते 1960 या काळात गंगाधर गाडगीळ, अरविंद गोखले, पु·भा·भावे, माडगूळकर यांनी वास्तवातेकडे - अस्सलतेकडे झेपावणा-या कथेला अधिक सूचकता नि सूक्ष्मता मिळवून दिली·

इ·स·1960 नंतर मराठी कथा अधिक सकस, प्रयोगक्षम आणि कलासंपन्न बनली·

इ·स·1945 पासून प्रादेशिक कथावाङ्मयाची निर्मिती वि·स·सुखटणकरांनी केली· पुढे लक्ष्मणराव सरदेसाई, जयवंतराव, कंटक, पै, बा·द·सातोस्कर इत्यादींनी प्रादेशिक कथेला खतपाणी घातले· 1941 मध्ये ग्रामीण कथावाङ्मयाच्या क्षितीजावर माटे यांचा उदय झाला·

इ·स·1941 ते 1946 मध्ये श्री·म·माटे, ग·ल·ठोकळ, र·वा·दिघे, म·भा·भोसले यांनी सातत्याने ग्रामीण तथा प्रादेशिक कथा लिहल्या· सुखठणकरांनी दाखवून दिलेल्या वाटेवर या लेखकांना यश आलेले दिसते·

इ·स·1946 ते 1960 च्या दरम्यान ग्रामोण कथेतही अंतर्बाह्य बदल झाला· माडगूळकरांनी ग्रामोण प्रांतात नवकथेचा प्रवाह सुरू केला· याच नवकथा प्रवाहाला शंकर पाटील, मिरासदार, रणजोत देसाई, रा·रं·बोराडे, अण्णाभाऊ साठे, महादेव शास्त्री यांनो विकासगर्भ रूप देण्याचा प्रयत्न केला·

इ·स·1960 नंतर आनंद यादव ते द·ता·भोसलेंपर्यंत, जे अनेक कथाकार पुढे आले त्यांनी नवकथेच्या विकासाचा पुढचा टप्पा गाठलेला दिसतो· म्हणजेच ग्रामीण तथा प्रादेशिक कथेला अंतःस्पर्शी जीवंत स्पंदन, जातीवंत तळमळ आणि सर्जकता मिळवून देण्याचे कार्य या लेखकांनी केले· अर्थातच 1960 नंतरची ग्रामीण कथा अधिक सकस प्रयोगक्षम आणि कलासंपन्न झालेली दिसते·

एकूणच मराठी कथावाङ्मयाच्या आणि ग्रामीण कथावाङ्मयाच्या उदय आणि वाटचालीवरुन नजर टाकल्यानंतर, मराठी कथावाङ्मयाला स्वतःचा असा फार मोठा इतिहास लाभला आहे तसेच त्याला वैभवशाली परंपराही लाभली आहे, याचे प्रत्यंतर येते·

प्रदेशवारीनुसार आणि वाङ्मयप्रकारानुसार "ग्रामीण" व "प्रादेशिक" यातील भेद दाखवून देण्याचा प्रयत्न केला जातो· परंतु प्रादेशिक हे विशेषण-कोणत्याही प्रदेशातील, कोणत्याही वाङ्मयप्रकाराने तसा प्रादेशिक आविष्कार घडवल्यावर त्याला ते प्राप्त होऊ शकेल, हेच खरे· मग तो वाङ्मयप्रकार कविता असो, कथा असो की कादंबरी असो आणि तो कोणत्याही प्रादेशिक परिसरातील असो·

"ग्रामीण" व "प्रादेशिक" या दोन्ही साहित्याच्या निर्मितीमागील लेखकाची जाण, एकच उदयकाल, दोहोंचाही जन्मदात्रा एकच एक ग्रामीण भू-प्रदेश, तसेच एकस्वरूपी प्रेरणा आणि अभिव्यक्ती स्वरूपही· हेच या दोहोंतील मूलभूत साम्य आहे· आणि त्या दोहोंतील भेद मात्र एवढाच की, त्या दोहोंची आविष्कार वैशिष्टये भिन्नआहेत· भिन्न आविष्कार वैशिष्टयामुळे आणि त्या आविष्कार वैशिष्टयांच्या भिन्न गुणधर्मामुळे ते परस्परांहून भिन्न ठरते, हा समज आजअखेर बलवत्तर झालेला दिसतो·

प्रादेशिक साहित्यातील भौगोलिकता, निसर्ग, संस्कृती, सामुहिकता, सामाजिकता आणि बोलीभाषा इ· प्रादेशिक साहित्याची आविष्कार वैशिष्टये, ही ग्रामीण साहित्याच्या आविष्कार वैशिष्टयांहून भिन्न आहेत असे म्हटले जाते· परंतु एकाच प्रादेशिक विभागातील ग्रामीण व प्रादेशिक साहित्यात येणारे सामाजिक,

सांस्कृतिक व धार्मिक जीवन आणि बोलीभाषा इत्यादी घटकतत्त्वांत भिन्नता असते असे म्हणता येणार नाही·

"ग्रामीण" व "प्रादेशिक" या दोहोंत काहीच फरक नाही असे वाटणे थोडे गैरही असेल· परंतु एका विशिष्ट मर्यादेपर्यंत ते दोन्ही एकच आहे असे समजणेही गैर नाही· मात्र ते दोन्ही सर्वस्वी भिन्न आहे असे समजणे मात्र निश्चित गैर ठरेल·

ग्रामीण आणि प्रादेशिक यातील महत्त्वाचा फरक एवढाच की, "सगळ्याच ग्रामीण साहित्यात **शक्य तेवढया प्रमाणा**त प्रादेशिक घटकांचे प्रतिनिधित्त्व स्विकारलेलेच असेल असे सांगता येत नाही· म्हणूनच ग्रामीण साहित्य हे प्रादेशिक नव्हेच असे म्हटले जाते, पण हे चूक ठरते·

खरे तर ग्रामीण साहित्याची घटकतत्त्वे ही प्रादेशिक साहित्याप्रमाणे प्रदेश पुरस्सर घटकतत्त्वांचे प्रतिनिधित्त्व करणारी असतील तर, ते ग्रामीण साहित्यही प्रादेशिक ठरण्यास हरकत नाही·

वास्तविक जे ग्रामीण असते ते प्रादेशिक असतेच· कारण प्रदेश विशिष्टतेचे काही गुणविशेष त्याला लाभलेले असतात· अर्थात हे गुणविशेष त्या साहित्याने आणि लेखकाने कितपत स्विकारले आहेत, यावरूनही त्याचा प्रादेशिक म्हणून दर्जा ठरवला जातो· ज्या ग्रामीण वाड्मयामध्ये त्या-त्या प्रदेशाची, तेथील लोकजीवनाची प्रकर्षाने चित्रणे केलेली असतात तथा ज्या ग्रामीण साहित्यात त्या प्रदेशाच्या खूणा ठळकपणे प्रतित होतात, त्या ग्रामीण साहित्याला प्रादेशिक हे नामाभिधान प्राप्त होत असते·

विशिष्ट प्रदेशातील निसर्ग आणि मानव समूह यांच्या एकत्रित चित्रणा-बरोबरच, त्या प्रदेशातील सर्वच प्रादेशिक घटकांच्या सायुज्य परिस्थिती परिणामातून आकाराला येणारा आविष्कार म्हणजे "प्रादेशिकता" होय· विशिष्ट भौगोलिक प्रदेश असे म्हणताच त्या प्रदेशातील प्रदेशपुरस्सर सारे काही आले, असा अर्थ अभिप्रेत असतो·

प्रादेशिकतेबद्दलच्या विविध मान्यवरांच्या मतांतून, प्रादेशिकतेच्या भिन्न घटकतत्त्वांवर तथा वैशिष्टयांवर एकत्रित भूमिकेतून प्रकाश पाडता येतो· अर्थातच प्रादेशिक साहित्यातील निसर्ग हा त्या कलाकृतीशी एकजीव झालेला असतो· तथापी त्यात मानवी जीवन व निसर्ग यांचे एकरूपत्त्व साधले गेलेले असते· प्रादेशिक साहित्यात येणारा प्रदेश हा ग्रामीण जीवनाशी संलग्न असतो· म्हणूनच प्रादेशिक साहित्यातील संस्कृती सुध्दा विशिष्ट अर्थाने ग्रामीणच असते, नागर नव्हे· तसेच प्रदेशपुरस्सर सामाजिकता आणि सामुहिक-प्रादेशिक लोकजीवन प्रादेशिक साहित्याला अभिप्रेत असते· सामुहिकता तथा समुहकेंद्रितता हे प्रादेशिक साहित्याचे महत्त्वाचे वैशिष्टय ठरते· तसेच प्रदेशनिहाय बोली यांसह तेथील जीवननाट्य व समस्या यांचा अंतर्भाव प्रादेशिक साहित्यात होतो· अशी ही एकत्रित भूमिका दिसून येते·

प्रादेशिक साहित्यात समाविष्ट होणारी घटकतत्त्वे ही इतर प्रदेशाच्या तुलनेत भिन्न असतात· यातूनच प्रत्येक प्रदेशाला स्वतःची अशी भिन्न प्रदेश वैशिष्टये लाभलेली असतात· या भिन्न प्रदेश वैशिष्टयांच्या भिन्न आविष्कारातूनच त्या कलाकृतीला प्रदेशपुरस्सर प्रादेशिक वेगळेपण प्राप्त होत असते·

लेखकाच्या व्यक्तिमत्त्वावर वास्तवातील प्रादेशिक विशिष्टतेचे संस्कार झालेले असतात किंवा ती प्रादेशिक विशिष्टता त्याला स्वतःच्या व्यक्तिमत्त्वावर लादून घ्यावी लागते· या दोन अर्थाने त्याच्या व्यक्तीमत्त्वावर प्रादेशिकतेचा परिणाम हा होतच असतो·

प्रादेशिकता किंवा ग्रामीण साहित्यातील प्रादेशिकता हे स्वतंत्र वाङ्‌मयीन मुल्य होऊ शकत नाही· तर भिन्न आविष्कार वैशिष्टये घेऊन जन्माला येणा-या साहित्याची ती एक संज्ञा आहे· तथा ती एक वाङ्‌मयीन प्रवृत्ती आहे·

द·ता·भोसले यांनी कथेबरोबरच कादंबरी, नाटक, चरित्र आणि समीक्षा लेखनही केले आहे· तरीही त्यांचा मूलभूत पिंड हा कथाकाराचाच दिसून येतो·

त्यांच्या कथांना सत्यानुभूतीचे अधिष्ठान असल्याचे दिसून येते· त्यांची कथा ही आनंद यादवांच्या कथेला जवळ जाणारी आहे·

प्रादेशिक जीवनदर्शन हे त्यांच्या कथांचे महत्त्वपूर्ण वैशिष्टय ठरते·

त्यांच्या "अगं अगं म्हशी" या कथासंग्रहाने प्रादेशिक जीवनाचे वेगळे क्षितिज शोधण्याचा प्रयत्न केला आहे· आणि प्रादेशिक जीवनातील विनोदाचा आनंददायी आविष्कार घडवला आहे·

"पाऊस" या कथासंग्रहातून प्रादेशिक जीवनाशी बांधल्या गेलेल्या सर्वसामान्य लोकांच्या जीवनातील दुःख, दैन्य, दारिद्रय, व्यथा आणि वेदनाच अधिक्याने चित्रित झाल्या आहेत·

शेतकी जीवनाशी आणि प्रदेश जीवनाशी संलग्न असणा-यांच्या सुखदुःखाचे चित्रण, ग्रामीण स्त्रीयांच्या सुखदुःखाचे चित्रण, दलित नि झोपडवाशीयांच्या उपेक्षीत जीवनाचे चित्रण, हातावर पोट भरणारे, शेतमजूर , सालगडी नि कष्टकरी असे स्त्रीया आणि पुरुष यांच्या सुखदुःखाचे चित्रण त्यांच्या कथेत येते· यातूनच त्यांच्या कथाविषयात आणि आशयात वैविध्य असल्याचे दिसून येते·

प्रादेशिकतेच्या परिस स्पर्शाने त्यांच्या कथानुभवाला मानवी जीवनदर्शनाची व प्रदेश दर्शनाची सूक्ष्म खोली प्राप्त झाल्याचे दिसते·

प्रादेशिक घटकांच्या प्रादुर्भावामुळे त्यांच्या कथा सौंदर्यात भर पडलेली दिसते·

प्रादेशिकतेमुळेच त्यांच्या अनुभवाला सहजता आणि स्वाभाविकता प्राप्त झाल्याचे दिसते·

त्यांच्या कथेतून आलेली प्रादेशिकता ही त्यांच्या प्रदेश आकलनाला प्रामाण्य मिळवून देते·

दुष्काळी जीवन जगणाऱ्या लोकजीवनाची आणि वातावरणाची निर्मिती त्यांच्या कथांतून झालेली आहे.

त्यांच्या कथांना सांगोला परिसरातील प्रादेशिकतेचे अंग आहे. हे अंग तेथील भौगोलिकता, निसर्ग, संस्कृती, सामुहिकता, सामाजिकता, बोलीभाषा आणि तेथील जीवननाट्य व समस्या इत्यादींच्या कमी-अधिक आविष्कारातून ध्वनित होताना दिसते.

त्यांच्या कथांतून आलेले प्रादेशिक घटक हे इतर प्रदेशाच्या तुलनेत काही बाबतीत भिन्न ठरतात. यातूनच त्यांच्या प्रादेशिकतेला आणि त्यांच्या कथा-साहित्याला प्रादेशिक वेगळेपण लाभल्याचे दिसते.

दुष्काळग्रस्त प्रदेशाची सांगता करणारा लोकसमूह, प्रदेशपुरस्सर सामाजिकता आणि आदिमतेकडं झुकलेली संस्कृती इत्यादी घटकतत्त्वांमुळे त्यांच्या कथेतील प्रादेशिक वेगळेपणाला अधिक उठाव मिळतो.

भोसल्यांच्या जवळ-जवळ सर्वच कथांतून सामाजिकता प्रतित झाली आहे. म्हणजेच एका अर्थी त्यांच्या बहुतांश कथा या सामाजिक कथाच आहेत. म्हणूनच सामाजिक जीवनदर्शन हेच त्यांच्या कथांचे प्रमुख उद्दिष्ट दिसते. यामुळेच त्यांच्या कथेतील प्रादेशिकता ही सामाजिकतेतूनच अधिक प्रमाणात ठळक होताना दिसते.

भोसल्यांच्या कथांतून जवळ जवळ सर्वच प्रादेशिक घटक कमी-अधिक फरकाने प्रदेशोन्मुख होऊन आल्याचे आढळून येते. त्यामुळेच त्यांच्या कथा या अनेकांगी परिणाम साधतात असे दिसून येते. म्हणूनच त्यांच्या कथा या प्रादेशिक कथा आहेत हे नाकारता येत नाही.

त्यांच्या विनोदी कथेतील एखादं-दुस-या असंभाव्य प्रसंगाचा अपवादात्मक दोष वगळल्यास, त्यांची विनोदी कथा अधिक गुणवान ठरते. तसेच एखादं दुस-या कथेतील प्रादेशिक घटकांचा अभाव तथा प्रदेशविन्मुखतेचा अपवादात्मक दोष वगळल्यास, त्यांची कथा ही प्रदेशबाह्यतेपेक्षा प्रदेशपुरस्सर प्रादेशिकतेशी नाते जोडणारी आहे. किंबहूना प्रादेशिकतेच्या दृष्टीने त्यांची कथा ही अधिक गुणवान तथा अस्सल प्रादेशिक ठरते.